बीड |जालना| छत्रपती संभाजीनगर | पुणे | अहमदनगर,सोलापूर,नागपूर,यवतमाळ → आर. एन. आय. एमएएच /एमएआर / २०१४/ ५८०९० → शनिवार दि.१० जानेवारी २०२६ → वर्ष १० वे → अंक -१८३ → पाने ४ → किंमत २ रु
Beed /Jalna/ Chatrapati Sambhajinagar / pune / Ahamadnagar → RNI : Regd.No.MAHMAR/2014/58090 → Saturday Date: 10 January 2026 → 10 th Year → 183 Paper → Pages : 4 → Price - 2 Rupees

महाराष्ट्राचा महानायक
# लोकनायक
संपादक - भारत गायकवाड

# बीडमध्ये गोडाऊनला आग

## अग्निशामक दलाच्या गाड्या नादुरस्त असल्याची बाब समोर येताच दुरूस्तीच्या सूचना

**बीड शहरातील एमआयडीसी परिसरात असलेल्या एका गोदामाला पहाटे अचानक भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात माल जळून खाक झाला. घटनेची माहिती मिळताच आमदार विजयकुमार पंडित यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी करत नुकसानग्रस्तांना धीर दिला, तसेच पंचनामा करून तातडीची मदत व नवीन गोदाम उभारणीबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.**



**लोकनायक वृत्तसेवा –** बीड शहरातील सहयोग नगर भागातील गोडाऊनला आज सकाळी आग लागली, या ठिकाणाची बीड राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. विजयसिंह पंडित यांनी पाहणी केली. गेल्या अनेक दिवसापासून बीड नगरपालिकेच्या अग्निशामक दलातील गाड्या नादुरुस्त असल्याची गंभीर बाब यावेळी समोर आली. महत्त्वाच्या वेळी अति अग्निशामक दलाच्या गाड्या सज्ज असणे आवश्यक असताना गेल्या अनेक दिवसापासून याकडे येथील, पालिका प्रशासन व येथील सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले असल्याचे दिसून आले. या घटनेचा पंचनामा करण्याच्या सूचना यावेळी संबंधित प्रशासनाला आ.विजयसिंह पंडित यांच्याकडून देण्यात आल्या.

बीड नगर परिषदेच्या अग्निशामक दलाकडे चार अग्निशामक गाड्या आहेत त्या तात्काळ दुरुस्त करून सेवेत दाखल करण्याच्या सूचना आ.विजयसिंह पंडित यांनी पालिका प्रशासनाला यावेळी दिल्या. राज्याचे विकासभिमुख उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आ.विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नातून जिल्हा वार्षिक योजनेतून नवीन अग्निशामक दलाच्या २ गाड्या घेण्याचा निर्णय घेतलेला असून त्या लवकरच बीड करांच्या सेवेत दाखल होतील.यावेळी माजी नगरसेवक इकबाल शेख, नगरसेवक महेश धांडे, महेश राऊत, संतोष जाधव यांच्यासह या भागातील नागरिकांची उपस्थिती होती.सदर आग लागल्यानंतर आग विझवण्यासाठी आ. विजयसिंह पंडित यांच्या टीम मधील कार्यकर्त्यांनी व स्थानिक नागरिकांनी परिश्रम घेतले.

# बीडमध्ये बाबरी मुंडे यांच्या हस्ते नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार



**लोकनायक वृत्तसेवा –** बीड शहरातील नव-निवडीत नगरसेवकांचा भव्य सत्कार सोहळा सहकारी बँकेचे संचालक तथा सामाजिक कार्यकर्ते बाबरी मुडे यांच्या हस्ते पार पडला. बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीत यश मिळवलेल्या नगरसेवकांचे अभिनंदन करताना बाबरी मुडे यांनी शहराच्या विकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केले.या सत्कार समारंभात बाबरी मुडे यांनी नव-निवडीत नगरसेवकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. यावेळी त्यांनी नगरसेवकांकडून नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात, स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य व शिक्षण यांसारख्या मूलभूत सुविधांवर भर द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.कार्यक्रम बीड शहरातील गिरीजादेवी कॉलनी, तेलगाव नाका परिसरात पार पडला. या वेळी नव-निवडीत नगरसेवक बाळासाहेब गुंजाळ, रंजित बनसोडे, शुभम धूत, राकेश (अण्णा) जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. तसेच भारत कांबळे, नंदकिशोर पिंगळे, इरफान शेख, रोहिदादा शेख, दत्ता जाधव, सुरज गुंडे, सनी माने पाटील आदींचीही उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे आयोजन बाबरी मुडे बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने

करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी बाबरी मुडे यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. सत्काराला प्रतिसाद देताना नव-निवडीत नगरसेवकांनी नागरिकांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता शहराच्या सर्वांगीण विकासासाठी

कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.या सत्कार समारंभामुळे शहरातील राजकीय व सामाजिक वातावरणात सकारात्मक संदेश गेल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

# अंबाजोगाईत निषेध मोर्चा

## खूनाच्या घटनेचा निषेध, आरोपींच्या अटकेची मागण



**लोकनायक वृत्तसेवा –** लातूर जिल्ह्यातील अल्पवयीन विद्यार्थ्याच्या निर्घृण खून प्रकरणाचा तीव्र निषेध करत अबाजागड येथे आज सकाळी भव्य निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले. या मोर्चामध्ये नागरिक, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, तसेच पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली.निषेध मोर्चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत काढण्यात आला. हातात फलक, घोषणा देत आंदोलकांनी प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. ङ्गआरोपींना त्वरित अटक कराङ्घ, ङ्गपीडित विद्यार्थ्याला न्याय द्याङ्घ, ङ्गशिक्षण संस्थांतील गुन्हेगारी थांबवाङ्घ अशा घोषणा यावेळी दिल्या गेल्या.मोर्चानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयावर ठिय्या आंदोलन करण्यात आले. आंदोलकांच्या वतीने निवेदन सादर करताना आरोपींना तात्काळ अटक करावी, प्रकरणाचा जलदगती तपास करून दोषींना कठोर शिक्षा द्यावी, तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी ठोस उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी करण्यात आली.यावेळी बोलताना वक्त्यांनी सांगितले की, अल्पवयीन विद्यार्थ्याच्या खून प्रकरणामुळे संपूर्ण समाज हादरून गेला असून, अशा घटनांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष देऊन तत्काळ कारवाई करण पान २ वर

# माजलगाव तालुक्यात दहशत निर्माण करणाऱ्या तिघांवर हद्दपार कारवाई

**लोकनायक वृत्तसेवा –**बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. माजलगाव तालुक्यात दहशत निर्माण करणाऱ्या तिघा सराईत गुन्हेगारांना जिल्हाबंदी (हद्दपार) करण्यात आले आहे. पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कांवत यांनी ही कारवाई केली असून संबंधित गुन्हेगारांना बीड, लातूर, परभणी व जालना या चार जिल्ह्यांतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्याचे आदेश दिले आहेत.माजलगाव शहरातील पो.स्टे. प्रभारी अधिकारी श्री. राहुल सूर्यवंशी यांनी माजलगाव तालुक्यात टोळीने गुन्हे करणाऱ्या आरोपींविरोधात प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावात ✻✻अशोक वसंत मेंढे (वय २१), कृष्णा तुकाराम सिरडे (वय २२) आणि अभिषेक अशोक शिंदे (वय २२)✻✻ या तिघांचा समावेश होता. संबंधित आरोपींवर मारहाण, जबरी चोरी, घरफोडी, धमकी, दहशत निर्माण करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान, दंगल, लोकांना मारहाण करणे, गुंडगिरी करणे अशा गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याचे नमूद करण्यात आले होते.या तिघांविरोधात विविध पोलीस ठाण्यांत ५५ पेक्षा अधिक गंभीर गुन्ह्यांची नोंद असून, त्यांची दहशत परिसरात वाढत असल्याने सामान्य नागरिक भयभीत झाले होते. पोलिसांनी या प्रकरणी सखोल चौकशी करून उपविभागीय पोलीस अधिकारी माजलगाव यांच्या मार्फत प्रस्ताव सादर केला. त्यानंतर पोलीस अधीक्षक पान २ वर

# गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करा - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर



**लोकनायक वृत्तसेवा –** विद्यार्थ्यांनी भविष्यात स्पर्धेचा काळ ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत उज्वल भविष्य घडविण्याचे प्रयत्न करावेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.
सौ.के.एस.के. अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते हर्षद क्षीरसागर, सहसचिव गोविंद साळूंके, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झेड.एच. सय्यद, प्रा.डॉ.एस.टी. शिंदे, प्रा. डॉ. व्ही.बी. तागड, प्रा.पी.जी. पौळ, डॉ.जी.पी. राऊत, प्रा.के.डी. पान २ वर

# विना परवाना बेकायदेशीर रित्या तलवार बाळगल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता : ॲड गणेश हनुमंत तावरे



**लोकनायक वृत्तसेवा –** विना परवाना बेकायदेशीर रित्या तलवार बाळगल्याच्या व लोकसेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा केल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता थोडक्यात माहिती अशी की दिनांक २७/०४/ २०२४ रोजी १२.३० वा चे सुमारास पोलीस कर्मचारी गुन्हे प्रतिबंधक/नाकाबंदी करत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की एक इसम नामे राजेश कोंडीराम चव्हाण रा.बाजीराव नगर बार्शी नाका बीड ता.जि.बीड हा साठे चौका कडून सुभाष रोडने पायी चालत येत असताना सांगली बँक कॉर्नर येथे विना परवाना बेकायदेशीर रित्या शर्टच्या मागील बाजूस आत मध्ये एक लोखंडी धारदार तलवार नावाचे घातक शस्त्र स्वतःचे ताब्यात मा.जिल्हाधिकारी साहेब बीड यांच्या शस्त्र मनाई आदेश लागू असताना गुन्हा करण्याच्या उद्देशाने शर्टच्या मागील बाजूस आत मध्ये लावून परिसरात फिरत आहे पान २ वर

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

प्रो.सागर गायकवाड मो.9860145412
सागर
ग्लास हाऊस
आमच्याकडे सर्व प्रकारचे विन्डोज,डोअर, ॲल्युमिनियम पार्टीशनची कामे केली जातील तसेच लॅमिनेशन डोअर सनमाइक डोअर फायबर डोअर सागवन डोअर योग्य भावत तयार करुण मिळतील.
पत्ता: श्री संत सावतामाळी चौक कृष्णमंदिर रोड बीड

लोकनायक
शनिवार दि.१० जानेवारी २०२६


# मेहरबानानों !, एकजुटीने आटपाडीला देशात अव्वल बनवा ! - सादिक खाटीक यांचे आवाहन

आटपाडी - आटपाडी नगरपंचायतीत निवडून आलेले नगराध्यक्ष व सर्व १७ नगरसेवक - नगरसेविकांनी आटपाडी शहराला सर्वच बाबतीत देशात अव्वल आणण्यासाठी एकजुटीने कारभार करावा . अशी अपेक्षा व आवाहन आटपाडीचे सामाजिक कार्यकर्ते व ज्येष्ट पत्रकार सादिक खाटीक यांनी केले आहे . नुकत्याच संपन्न झालेल्या नगरपंचायतीच्या पहिल्याच निवडणुकीत आटपाडी शहरवाशीयांनी कोणत्या एकाच पक्षाला बहुमत दिले नाही . राज्यातील सत्त-ेतल्या परंतू येथे परस्पर विरोधात लढलेल्या तीन पक्ष आणि एका आघाडीला मर्यादेत यश देवून सर्वांनाच न्याय देण्याचा जनता जनार्धनांचा कौल हा सर्वांनी एकजुटीने काम करावे असाच अधोरेखित करणारा वास्तवात दिसून आला. राज्याच्या सत्त-ेतल्या प्रमुख ३ पक्षांच्या आणि स्थानिक आघाडीच्या मध्येच झालेल्या चुरशीच्या लढतीत सर्व जणांना मर्यादेपर्यत यश देण्यात ही निवडणूक यशस्वी झाली . नगराध्यक्ष पदासह भाजपाला ७ जागी यश मिळाले तर ८ जागी शिवसेनेची सरशी झाली . अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीने आणि तीर्थक्षेत्र आघाडी पंढरपूरने प्रत्येकी १ जागा जिंकत, पैशाच्या वाहत्या वादळी घोंगावात आपले अस्तित्व राखले आहे . एकुण कार्यक्षेत्राच्या बाबतीत, आटपाडी नगरपंचायत, सांगली, मिरज, कुपवाड महानगरपा-लीकेनंतर दुसऱ्या स्थानावर आणि सांगली जिल्ह्यातील सर्व नगरपालीका, नगरपंचायतीमध्ये पहिल्या स्थानावर आहे . मुळ आटपाडी ग्रामपंचायतीत पुर्वी समाविष्ट असलेली पुजारवाडी ( सोनारसिद्धनगर ), देशमुखवाडी, यप्पावाडी, खांजोडवाडी, मास-ळवाडी, मुढेवाडी, शेंडगेवाडी या सात गावांचा आताच्या भिंगेवाडी, मापटेमळा सहच्या आटपाडी नगरपंचायतीत समावेश झाल्यास आटपाडी नगरपंचायतीचे कार्यक्षेत्र सांगली मिरज कुपवाड महानगरपालीकेपेक्षाही सर्वात मोठे ठरेल . भविष्यात पूर्वीच्या आटपाडी ग्रामपंचायतीत समाविष्ट सर्व गावांचा समावेश पुन्हा आटपाडी नगरपंचायतीत होऊ शकतो . प्रारंभा पासुनच कार्यक्षेत्राच्या बाबतीत नैसर्गीक अव्वलता मिळालेल्या आटपाडीला सर्वच बाबतीतील चौफेर आणि सर्वांगीण विकास करण्याला मोठा वाव आहे . नगराध्यक्षांसह सर्व नवनिर्वाचित नगरसेवक एकदिलाने, एकजुटीने आटपाडी शहराच्या विकासासाठी झटल्यास आटपाडी नगरपंचायत सर्वच बाजुंनी चौफेर व सर्वांगीण प्रगतीच्या बाजुनी देशात अव्वल येण्यापासून कोणी रोखू शकणार नाही . या सर्व मेहेरबानांची एकजुट सांधली गेल्यास त्यांच्या पाठीशी दोन विद्यमान आमदार, दोन माजी आमदार, आमदारकी



इतका प्रभाव असणारे तीन मातब्बर नेते उभे ठाकले जातील . शिवाय राज्य - देशातील सत्तेशी ही मंडळीं जोडली गेलेली असल्याने या दोन्ही सत्तांचा मोठा फायदा आटपाडी नगरपंचायतीला मिळिवता येणार आहे. या एकाच पंचवार्षिक मध्ये आटपाडी नगरपंचायतीला पुढच्या दहा पंचवार्षीकचा प्रचंड विकास केवळ एकोप्याच्या सांघीक शक्ती, सजग प्रयत्न आणि पाठपुराव्यातून साधता येणार आहे . ६ दशकापूर्वीच्या नया दौर चित्रपटातील,साथी हाथ बढाना !एक अकेला थक जाएगा, मिलकर बोझ उठाना !साथी हाथ बढाना,साथी हाथ बढाना, साथी रे !! या गीतातील आशयाला समोर ठेवून आटपाडी नगरपंचायतीच्या सर्वच मेहरबानांनी एकतेतून सुसंवाद साधल्यास विकास कामांचे डोंगर उभे राहणार आहेत . सांगली, मिरज, कुपवाड महानगर पा-लीकेवर पहिल्यांदा सत्ता आल्यावर त्या वेळच्या राज्य शासनाने अर्थात देवेंद्र फडणवीस यांच्याच नेतृत्वाखालील सरकारने सांगली मिरज कुपवाड महानगरपालीकेला विकास कामांसाठी ९ वर्षापूर्वी १०० कोटीं रुपयांचे गिफ्ट पॅकेज दिले होते . जिल्ह्यातील सर्व नगरप-ालीका आणि नगरपंचायतीच्या कार्यक्षेत्रात पहिल्या आणि महापालिकेनंतर दुसऱ्या स्थानी असणाऱ्या आटपाडी नगरपंचायतीवर भाजपचा नगराध्यक्ष विराजमान झाल्याने आणि राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच सरकार सत्तेत असल्याने आटपाडी नगरपंचायतीला विकास कामांसाठी ९ वर्षापूर्वीचे १०० कोटी आताचे दाम दुप्पट अर्थात २०० रुपये ठरतात .या न्यायाने आटपाडी नगरपंचायतीला २०० कोटी गिफ्ट पॅकेज देवून राज्य शासनाने देशभर नावलौकीक असलेल्या आटपाडीचा यथोचित गौरव करावा . बालपणापासून आर . एस . एस . आणि तारुण्यानंतर आजअखेर जनसंघ भाजपासाठी जीवन समर्पित केलेले नव्वदीतले उत्तर प्रदेशचे माजी राज्यपाल श्री . राम नाईक साहेबांची ही प्राणप्रिय आटपाडी आहे . तसेच पत्रकारीतेतून जगभर नावलौकीक संपादन केलेल्या एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर यांच्याही अंतकरणात या आटपाडी शहराला अनन्यसाधारण महत्व आहे . अशा अनेक थोरामोठ्यांच्या ऐतिहासिक वारशाच्या आटपाडीचा गौरव केल्यास या मान्यवर महोदयांचाही अप्रत्यक्ष गौरव केल्यासारखे होणार आहे हे लक्षात घेऊन राज्य शासनाने २०० कोटीचे गिफ्ट पॅकेज तातडीने आटपाडी नगरपंचायतीस द्यावे अशी निखळ अपेक्षा राज्य सरकारकडे सादिक खाटीक यांनी केली आहे .

उपनगराध्यक्ष पद , विषय समित्यांचे किमान ५ सभापती आणि २ स्वीकृत सदस्य असे पदाधिकारी पक्षीय भेद बाजुला सारत सर्वसंमतीने निवडत आटपाडी नगरपंचायतीच्या १८ मेहेरबान आणि त्यांच्या नेत्यांनी एकजुटीचा नवा अध्याय सुरू करावा असे आवाहनही सादिक खाटीक यांनी केले आहे .

**महाराष्ट्र शासन**
**ग्रामपंचायत कार्यालय होळ ता.केज जि.बीड**
**B1-निविदा सुचना क्र.01**

अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास योजना सन 2025-26 व 15 वा वित्त आयोग करिता सरपंच/ ग्रामसेवक यांच्याकडुन जि.प. बीड बांधकाम/ महाराष्ट्र जिवन प्राधिकरण खात्याकjडिल नोंदणीक्रत कंत्राटदार यांच्याकडुन एकुण 2 कामांकरिता बी-1 नमुण्यातिल निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नाव:-**
1)Repair to GRampanchayat Karyalay At Hoal Tq Kaij Dist Beed (Estimate Cost-Rs.300000
2)Construction of Internal C C Road and Drain at Sathe Nagar At Hoal Tq Kaij Dist Beed (Estimate Cost-Rs.1000000

**नोट-** वरिल निविदे प्रक्रियेची संपुर्ण माहीती ग्रामपंचायत कार्यालय **होळ** येथे कार्यालयीन वेळेत दि. 10-01-2026 ते 17-01-2026 या कालावधीत उपलब्ध आहेत.

स्वाक्षरीत /-
सरपंच ग्रामसेवक
ग्रामपंचायत कार्यालय होळ

## पान १ वरून

**अंबाजोगाईत निषेध मोर्चा**

` आवश्यक आहे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला.

निवेदन स्वीकारल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांनी तपास जलदगतीने सुरू असून लवकरच आरोपींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले. मात्र, ठोस कारवाई होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलकांनी व्यक्त केला आहे.

**माजलगाव तालुक्यात दहशत निर्माण**

नवनीत कांवत यांनी दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी हद्दपार आदेश जारी केला.या आदेशानुसार संबंधित आरोपींना बीड, लातूर, परभणी व जालना जिल्ह्यांत प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही पोलिस प्रशासनाने दिला आहे.या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. शैलेश नायकवाड, पोलीस निरीक्षक श्री. राहुल सूर्यवंशी यांच्यासह पोलिस अधीक्षक कार्यालयातील एमपीडीए, मोक्का विभागातील अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.ररररररररररररररररर

**गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा** नागरगोजे, प्रा.डॉ.जी.एम.बोडखे, प्रा.डी.ए.मुटकुळे, प्रा.बी.आर. चादर, प्रा.एस.आर.मस्के, प्रा.ए.सी. गार्डी, एल.एम. बोंद्रे आदिंसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते. हैद्राबाद येथील राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळिवलेल्या स्नेहा दुधाळ हिचा सन्मान करण्यात आला तर आंतरविद्यापीठ महोत्सवात यश प्राप्त केलेल्या वेदांत स्वामी आणि अमित दळवी तसेच अभिजीत निकम या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हैद्राबाद येथील राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी निवड झाली. तसेच गिता परजने, वैष्णवी भोंडवे, श्रेया लांब, घोडके सुरेश, मळेकर आशिष आदि विद्यार्थ्यांचाही माजी मंत्री क्षीरसागरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संस्थेचे नाव उज्वल करणाऱया विद्यार्थ्यांना आपण प्रोत्साहन देत असतो. याच विद्यार्थ्यांची प्रेरणा घेऊन यश मिळवावे. विद्यार्थ्यांना भविष्य काळात स्पर्धेच्या युगात टिकवून रहायचे असेल तर गुणवत्तेला प्राधान्य द्यावे लागेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून यशाकडे वाटचाल करावी. उज्वल भविष्य घडवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून योग्य मार्गाकडे लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे. आपल्या आई-वडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण उच्च शिक्षणाची वाट धरली आहे. यातून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला जमेल तो विषय आत्मसात करून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. अडचणी आणि अडथळे हे येतच असतात, जिद्द आणि इच्छा असेल तर यावरही मात करता येते. अनेक नव नवीन शोध लागू लागले आहेत. नवे प्रयोग पुढे येऊ लागले आहेत याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी पुढे जाणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी उपस्थित होते.

**विना परवाना बेकायदेशीर रित्या तलवार..**

अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावर सदर पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पंचांना घेऊन गुप्त बातमीचा उद्देश समजावून सांगून नाका बंदीच्या ठिकाणी सतर्क राहून वरील आरोपी आल्यावर आरोपीस ताब्यात घेतले व दोन पंचा समक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक धारदार तलवार मिळून आली.त्या तलवारीचे वर्णन एक पिवळया धातुची नक्षीदार मुठ असलेली व लोखंडी धारदार चमकदार पाते असलेली समोरील बाजुस निमुळती असलेली तलवार

## टी सी हरवला आहे

**हिराबाई बलभीम मुंडे रा दहिफळ( वड ) ता केज या नावाचा १२ वी पासचा टी सी केज ते दहिफळ ( वड ) बस प्रवासात हरवला आहे सापडल्यास खालील नंबरवर सम्पर्क साधावा मो नंबर ८०१०३७०९७२**

सदर तलवारीवर खालसा असे मराठी आक्षरात लिहीलेले जिची एकुण लांबी ३१.५ इंच व पात्याची लांबी २५.५ इंच व पात्याची रुंदी ३ से.मी. असलेली व मुठीची लांबी ६ इंच असलेली जुनी वापरती तलवार मिळून आल्याने त्याचा जागीच दोन पंचा समक्ष जप्ती पंचनामा करून तलवार गुन्हच्या तपास कामी ताब्यात घेतली त्या नुसार पोलिसांनी आरोपी राजेश कोंडीराम चव्हाण याला पोलीस स्टेशन बीड शहर येथे घेऊन जाऊन त्याचे विरोधात गु.र.नं ९१/२०२४ नुसार गुन्हा दाखल केला. त्यास कलम ४/३५ शस्त्र अधिनियम १९५९ व भा.द. वि १८८ प्रमाणे कायदेशीर फिर्याद दाखल केली व त्यानंतर पोलिसांनी सदरील गुन्ह्यात तपास करून दोषारोप पत्र मा. न्यायालयात दाखल केले. दोषारोप पत्रास आर.सी.सी.क्र ३०९/२०२४ असा दाखल झाला होता. त्यामध्ये फिर्यादी पक्षामार्फत ३ साक्षीदार तपासण्यात आले साक्षीदारांची साक्ष आरोपी विरुद्ध आरोप सिद्ध करू शकले नाही व आरोपीच्या बाजुने ॲड.गणेश हनुमंत तावरे यांनी घेतलेला बचाव ग्राह्य धरून व सबळ पुराव्या अभावी आरोपीस मा.मुख्य न्यायदंधादिकारी साहेब बीड यांनी आरोपीने तलवार बाळगल्याच्या कलम ४/२५ शस्त्र अधिनियम (अीाि अर्ली) व लोकसेवकाने रीतसर जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा केल्याच्या आरोपातून राजेश (बंटी) चव्हाण यांची निर्दोष मुक्तता केली.आरोपीच्या वतीने ॲड.गणेश हनुमंत तावरे यांनी

## पान ४ वरून

**५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात..**

वायूंचे प्रमाण मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते व स्वच्छ, आरोग्यदायी वातावरणाची निर्मिती होऊ शकते.या यशस्वी प्रकल्पासाठी मार्गदर्शक विज्ञान शिक्षक चाळक कामराज तसेच आर. के. पब्लिक स्कूलच्या संपूर्ण विज्ञान विभागाचे मोलाचे योगदान लाभले. या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाच्या बक्षीस वितरण कार्यक्रमाला विपुल भागवत (उपशिक्षणाधिकारी, जिल्हा बीड) आणि ॲड. संतोष पवार (बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष व 'आधार माणुसकीचा' संस्थेचे सचिव) यांची प्रमुख उपस्थिती होती, जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे पर्यवेक्षक मिलिंद तुरुकमारे , यावेळी जिल्ह्यातील विज्ञानप्रेमी, निसर्गप्रेमी, विद्यार्थी, पालक व बालवैज्ञानिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.राज्यस्तरासाठी प्रकल्प निवड झाल्याच्या निमित्ताने पार्थ प्रतिष्ठान संस्थेचे संस्थापक सचिव चाळक आर. के., संस्थेच्या अध्यक्षा सौ. योगिता चाळक, प्राचार्य गणेश चाळक, उपप्राचार्य ज्ञानेश्वर खरसाडे, अर्चना टेके, सुप्रिया तनपुरे, शेख रहीम तसेच संपूर्ण आर. के. परिवाराच्या वतीने विद्यार्थिनीचे अभिनंदन करण्यात आले असून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

**अग्रशक्ती बहु मंडळाचा पदग्रहण ..**

सांस्कृतिक व संघटनात्मक योगदानाबद्दल पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.माजी अध्यक्षांच्या मार्गदर्शनामुळेच मंडळाची वाटचाल अधिक सक्षम झाल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अग्रशक्ती बहु मंडळाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

**सेवानिवृत्ती वेतन धारकाच्या** जोशी यांनी पेन्शनरच्या प्रलंबित मागण्या व आठव्या वेतन आयोगाच्या अन्यायकारक अटीविरुद्ध मा. पंतप्रधान भारत सरकार नवी दिल्ली यांना जिल्हाधिकारी बीड यांचे मार्फत प्रमुख मागण्याचे निवेदन सादर केले. ज्या निवृत्तीवेतनधारकांनी आयुष्याची अनेक वर्ष राष्ट्र उभारणीसाठी खर्ची घातली त्यांच्या हक्कावर गदा आणणारे निर्णय अलीकडच्या काळात घेण्यात आले आहेत. त्यामुळे संपूर्ण पेन्शनर समुदायांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.१) व्हॅलिडेशन रुल्स २०२५ रद्द करा मार्च २०२५ च्या वित्त विधेयकानंतर लागू केलेले नवीन नियम पेन्शनरच्या आर्थिक सुरक्षितेवर घाला घालणारे आहेत. हे नियम त्वरित मागे घेण्यात यावे.२) आठव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी कोणत्याही विलंब विना १जानेवारी २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने पूर्व लक्ष्मी प्रभावाने करण्यात यावी आणि त्यामध्ये पेन्शन फिटमेंटचे सूत्र सन्मान जनक असावे.३) पेन्शनचे बाजारीकरण थांबवा. पेन्शन ही सामाजिक सुरक्षा आहे. तिला बाजार संबंधित मार्केट लिंकड जोखमीशी जोडण्याचा कोणताही प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून ज्येष्ठ नागरिकांच्या सर्व पेन्शनर यांच्यावरील मागण्या महत्त्वाच्या आयुष्याच्या सन्मानाने मंजूर करण्यात याव्यात अशी मागणी करण्यात आली. जर आमच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर आम्हाला आमचे आंदोलन अधिक तीव्र करावे लागेल याची नोंद केंद्र सरकारने घ्यावी.

**दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांकडून ..**

फळांचे वाटप केले जाते. परंतु यावर्षी स्वाभिमानी पत्रकार संघाच्या पत्रकार बांधवांनी रुग्णांना फळांचे वाटप व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य आणि फळांचे वाटप न करता केज शहरा पासूनच जवळ बोबडेवाडी रोड वरील स्वामी समर्थ वृद्ध आश्रम येथे आजी-आजोबा यांना भोजनदान करून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्याचे ठरवले. स्वामी समर्थ वृद्ध आश्रम हे गेल्या तीन ते चार वर्षापासून महादेव (बापू) कराड हे चालवतात परंतु या वृद्धाश्रमास शासनाचे अनुदान नाही. या वृद्धाश्रमातील आजी-आजोबांना मदत व्हावी. आणि त्यांचे सुखदुःख जाणून घेण्यासाठी व महादेव कराड यांना सहकार्य लाभावे या उद्देशांनी स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्येष्ठ पत्रकार महादेव काळे यांनी केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित असणारेमुनीर कुरेशी यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आजी आजोबा यांना रस्त्यावर सोडणाऱ्या मुलांच्या शरीरात कदाचित हृदय नावाचा अवयवच नसेल म्हणून वृध्दश्राम स्थापन करण्यात येत असून या वृध्दश्रामात आजी आजोबांना कोणतीही अडीअडचण किंवा गरज भासुद्या आम्ही सर्व पत्रकार मदतीला धावुन येवू. असे म्हणाले.यावेळी वृद्धाश्रमाचे संस्थापक अध्यक्ष महादेव (बापू)कराड यांनी पत्रकार बांधवासमोर आजी-आजोबांच्या व्यथा मांडल्या, पुढे बोलताना कराड म्हणाले की, गेलेल्या तिन वर्षांपासून कोणतेही शासकीय अनुदान नसताना स.वखर्चातुन मी आणि माझी पत्नी हा वृध्दाश्रम चालवत आहोत. आपल्यासारख्या दानशुर व्यक्तींनी आत्तापर्यंत भरपुर मदत केलेली आहे. करत आहेत. आणि आज पत्रकार बांधवांनी या ठिकाणी येऊन बाळशास्त्री जांभेकर यांची जय़ती आमच्या सोबत साजरी केली. आम्हा सर्वांना भोजन दान दिले त्याबद्दल त्यांनी पत्रकार बांधवांचे आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार तात्या गवळी यांनी केले तर उपस्थितांचे आभार पत्रकार वसंत सोनवणे यांनी मानले. यावेळी जेष्ठ पत्रकार मधुकर (दादा)सिरसठ, महादेव गायकवाड, संतोष गालफाडे, महादेव काळे, अनिल वैरागे, बाळासाहेब जाधव, स्वाभिमानी पत्रकार संघाचे अध्यक्ष तात्या गवळी, उपाध्यक्ष विकास सोनवणे, सचिव वसंत सोनवणे, कोषाध्यक्ष विवेक बनसोड, विनोद पवार, संजय खळगे, बाळासाहेब गलांडे, राहुल इनकर, विकास देशमुख, वैभव माचवे, नखाते सर यांच्यासह वृद्ध आश्रमातील आजी-आजोबा व पत्रकार बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप हा वृद्ध आश्रमातील आजी-आजोबा यांच्या समवेत स्नेहभोजनाचा अस्वाद घेवुन करण्यात आला. यावेळी केज येथील पत्रकार बांधवांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला.त्यामुळे या वर्षीचा दर्पण दिन अर्थात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती वृध्दाश्रमात साजरी झाल्याने सर्व पत्रकार बांधवांनी समाधान व्यक्त केले आहे. तर स्वाभिमानी पत्रकार संघाने घेतलेल्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे.

**गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी..**

प्रेरणा घेऊन यश मिळवावे. विद्यार्थ्यांना भविष्य काळात स्पर्धेच्या युगात टिकवून रहायचे असेल तर गुणवत्तेला प्राधान्य द्यावे लागेल. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून यशाकडे वाटचाल करावी. उज्वल भविष्य घडवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून योग्य मार्गाकडे लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे आहे. आपल्या आई-वडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आपण उच्च शिक्षणाची वाट धरली आहे. यातून प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्याला जमेल तो विषय आत्मसात करून पुढे जाण्याचा प्रयत्न करावा. अडचणी आणि अडथळे हे येतच असतात, जिद्द आणि इच्छा असेल तर यावरही मात करता येते. अनेक नव नवीन शोध लागू लागले आहेत. नवे प्रयोग पुढे येऊ लागले आहेत याचा अभ्यास करून विद्यार्थ्यांनी पुढे जाणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, कर्मचारी उपस्थित होते.

**मयत ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला ..**

महागोविंद, सरपंच भागवत गोंडे, सरपंच विलास ओडणे, अंगद घुगे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

loknayak 10.01.2026 - Copy - Copy - Copy:Copy of Layout 1 1/9/2026 11:28 PM Page 3



# संत वामन भाऊंचे चरित्र नाटकाच्या रूपाने दाखवून मिळालेल्या देणघेतून डोंगरकिन्ही येथे साकारले भव्य वामन भाऊंचे मंदिर

## डोंगरकिन्ही येथील तरुण मंडळाचा आदर्श, महंत विठ्ठल महाराजांचे सहकार्य

**लोकनायक वृत्तसेवा –** वैराग्याचे महामेरू ह .भ .प सद्गुरु वामनभाऊ महाराज यांचा ५० वा सुवर्ण महोत्सव सोहळा यावर्षी साजरा होत आहे. श्री शेत्र गहीनीनाथ गड या ठिकाणी यावर्षी हा सोहळा भव्य दिव्य स्वरूपात साजरा होताना दिसत आहे त्याचप्रमाणे दरवर्षी डोंगर किन्ही येथील संत वामन भाऊ प्रतिष्ठान वर भव्य असा पुण्यतिथी सोहळा साजरा केला जातो डोंगर किन्ही येथील संत वामनभाऊ मंदिर हे तरुण मंडळाच्या सहकार्याने तयार करण्यात आलेले आहे त्यासाठी गावकऱ्यांनी सुद्धा खूप सहकार्य केले येथील तरुण मंडळांनी ह भ प विठ्ठल महाराजांच्या सहकार्याने सद्गुरु वामनभाऊ महाराज यांचे जीवनावर नाटक तयार करून ते २०० गावांमध्ये त्याचे प्रयोग करून येणारा पैसा हा येथील संत वामनभाऊ महाराज मंदिर बांधण्यासाठी वापरण्यात आला सर्व तरुण मंडळ एक दिलाने हे काम करत होते प्रत्येक गावात जाऊन भाऊंचे चरित्र दाखवून पैसा गोळा करून तो कुठेही इतरत्र न खर्च करता त्यांनी डोंगर किन्ही येथे भव्य दिव्य असे वामन भाऊंचे मंदिर उभारण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी हरिभक्ती परायण विठ्ठल महाराज, शिवाजी महाराज येवले, नारायण महाराज दिसले ,स्वामी हरिहर आनंद



सरस्वती महाराज, यांनी खूप सहकार्य केले प्रत्येक गावात जाऊन लुगडे नेसून नाटक करून भारुडे करून येणारा पैसा हा सर्व या ठिकाणी सत्कारणी लावला आणि आज या ठिकाणी भव्य दिव्य असं भाऊंचं मंदिर उभारण्यात आलं याच मंदिरामुळे डोंगर किनी परिसरात धार्मिक कार्य मोठ्या जोमाने सुरू करण्यात आले. याच परिसरात भव्य दिव्य असा सभामंडप उभारण्यात आलेला आहे

तोही ग्रामस्थांच्या सहकार्यातून त्यात दरवर्षी या ठिकाणी परिसरातील सर्व लग्नकार्य या ठिकाणी साजरी केली जातात त्या ठिकाणी सर्व संयुक्त असं मोठं सभागृह बांधण्यात आलेला आहे त्यामुळे या परिसरातील जनतेची या ठिकाणी सोय करण्यात आलेली आहे दरवर्षी या ठिकाणी पुण्यतिथी मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते आणि त्यानंतर एक महिन्याने डोंगर किनी ते गहिनीनाथ गड पायी दिंडी सोहळा काढण्यात येतो आणि परत आल्यानंतर भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताह विठ्ठल महाराज गहीनाथ गडकर यांच्या अध्यक्षतेखाली आणि डोंगर किनी परिसरांच्या वतीने या ठिकाणी साजरा केला जातो ही परंपरा गेली २९ वर्ष मोठ्या उत्साहाने डोंगर किन्ही आणि परिसर साजरा करत आहे या ठिकाणी कसल्याही प्रकारची सक्तीने देणगी गोळा केली जात नाही ज्यांना इच्छेने देणगी द्यायची असेल ती आपली देणगी दरवर्षी सप्ताह सुरू झाल्यानंतर त्या ठिकाणी आणून देतात आणि त्या ठिकाणी होणाऱ्या कार्यक्रमासाठी सर्वजण मोठ्या तन मनाने हजेरी लावतात, इवलेसे रोप लावियेले द्वारी/ त्याचा वेलू गेला गगनावरी.या ऊक्तीप्रमाणे या ठिकाणी नाटक करता करता भव्य दिव्य असे मंदिर या ठिकाणी उभारले त्या सर्व तरुण मंडळाला व ग्रामस्थांना मानाचा जय हरी. – अरुण राणुजी येवले. डोंगरकिन्ही.

# सुनिल वासनिक यांची बँक प्रतिनिधी म्हणून निवड !

**यवतमाळ लोकनायक वृत्तसेवा** : यवतमाळ न. प. कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष तथा कवी कलावंत व साहित्यिक सुनिल वासनिक यांची जिल्हा मध्यवर्ती बँक प्रतिनिधी म्हणून न. प. कर्मचारी पतसंस्थेचे संचालक मंडळाच्या बैठकीत सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. सुनिल वासनिक हे गेली अनेक वर्षे सहकार क्षेत्रात कार्यरत असून विगत २५ वर्षापासून न. प. कर्मचारी पतसंस्थेचे संचालक म्हणून काम करताहेत. सोबतच साहित्य व कलाक्षेत्रातील एक जेष्ठ रंगकर्मी म्हणूनही त्यांची ओळख आहे. या नियुकीबद्दल त्यांचे पतसंस्थेचे संचालक मंडळातील सदस्य सर्वश्री महेश जोशी, प्रफुल जनबंधू, शेख शहजाद, नानाजी तलांडे, विनोद



दिवटे, सुनिल नाईक, अनिल चिंडाले, मनोज तिडके, श्रीमती प्राजक्ता वाघमोडे, रेखाताई डफफळे आणि सबा अफरोज आदींनी अभिनंदन केले आहे.

# अलहुदा उर्दू शाळेत 'आनंद नगरी'चा उत्साह; विद्यार्थ्यांनी जोपासले व्यावसायिक कौशल्यर

भोकरदन येथील अलहुदा उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यात व्यावसायिक कौशल्याची रुजवण करण्यासाठी 'कॅन्टीन डे' (आनंद नगरी) हा उपक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी केवळ खाद्यपदार्थांची विक्रीच केली नाही, तर हिशोब, नियोजन आणि संवाद कौशल्याचे उत्तम सादरीकरण करत सर्वांची मने जिंकली.आनंद नगरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बाजारातील व्यवहारांचा अनुभव देणे हा मुख्य उद्देश होता. व्यावसायिक कौशल्य, स्वच्छतेचे महत्त्व, वेळेचे नियोजन, संघभावना आणि ग्राहकांशी बोलण्याची कला विकसित व्हावी, या हेतूने शाळेने या उपक्रमाचे आयोजन केले होते.विद्यार्थ्यांनी स्वहस्ते तयार केलेले समोसे, सँडविच, केक, बिस्किटे, फळांचे ताजे रस आणि काही पारंपारिक चविष्ट पदार्थांचे स्टॉल्स लावले होते. संपूर्ण शाळा परिसर खमंग वासाने दरवळून गेला होता. विद्यार्थ्यांनी ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी आकर्षक सजावटही केली होती.या आनंद नगरीचे उद्घाटन आणि भेट देण्यासाठी



शहरांतील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये भोकरदनचे नगराध्यक्ष शमीम मिर्झा, नगरसेवक नसीम पठाण, कादीर बापू, जहीर कुरेशी, माजी नगरसेवक शेख रिजवान, इरफानोद्दीन सिद्दीकी, समाजसेवक हाजी मुजीब, मौलाना राज मोहम्मद,मौलवी फिरोज,शेख सलीम पत्रकार, डॉ उबैद खान,रफीक कुरेशी, मुश्ताक कादरी, शेख इसरार, मसूद शाह, लतिफ शाह, आणि इम्रान शाह, जाफर सर, हारून सर, नईम सर, वहीद सर, मुजफ्फर सर, शेख जावेद यांचा प्रामुख्याने समावेश होता. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या स्टॉल्सला भेट देऊन त्यांच्यातील कलागुणांचे कौतुक केले.संस्थेचे अध्यक्ष मा. शब्बीर कुरेशी साहेब यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना सांगितले की, 'केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नाही, तर प्रत्यक्ष जीवनातील आव्हाने पेलण्यासाठी असे उपक्रम गरजेचे आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि त्यांना भविष्यातील उद्योजकतेची प्रेरणा मिळते.'हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक युनुस खान, सय्यद जलील यांच्यासह शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. पालक वर्गानेही या उपक्रमाला मोठ्या संख्येने भेट देऊन विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित केला.अलहुदा उर्दू शाळेच्या या कल्पक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# शंकरराव चव्हाण विद्यालयात 'सखी सावित्री समिती' सभा संपन्न

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेवर मार्गदर्शन

**लोकनायक वृत्तसेवा –**वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात ७ जानेवारी बुधवारला 'सखी सावित्री समिती' ची विशेष सभा पार पडली सभेत विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षा आणि शिक्षणाचे महत्त्व यावर तज्ज्ञांनी मोलाचे मार्गदर्शन केले.सभेच्या सुरुवातीला सरस्वती माता आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ क्षितिजा महाजन, पोलीस उपनिरीक्षक प्रियंका पाटील यांची विशेष उपस्थिती होती.यावेळी डॉ. क्षितिजा महाजन यांनी मुलांच्या



सुरक्षिततेच्या दृष्टीने 'गुड टच आणि बॅड टच' यातील फरक कसा ओळखावा आणि अशा प्रसंगी स्वतःचा बचाव कसा करावा याचे सविस्तर मार्गदर्शन केलेशिवाय पोलीस उपनिरीक्षक प्रियंका पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षाची आठवण करून देत शिक्षणाचे महत्त्व विशद केले तसेच सध्याच्या काळात मोबाईलचा वाढता वापर आणि त्यातून होणारे दुष्परिणाम यावर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता ९ वर्गाची विद्यार्थिनी कु.आलिया बानू शेख हिने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाची शपथ दिली तिच्या पुढाकाराचे सर्वांनी कौतुक केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी सखी सावित्री समितीच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला त्या म्हणाल्या की केवळ पुस्तकी ज्ञान देने हे विद्यालयाचे ध्येय नाही विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य सुरक्षित ठेवने हि विद्यालयाची प्राथमिकता आहे आजच्या काळात मुलांनी आपल्या हक्काप्रति आणि सुरक्षिततेप्रति जागरूक राहणे काळाची गरज आहे पालकांनीही मुलांशी सवांद वाढवून त्यांच्यातील वेळीच बदल टिपणे आवश्यक आहे असे आवाहन केले.सभेला समितीचे समुपदेशक समीर नागदेवे, पालक प्रतिनिधी श्रीमती फातमा खातून, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी मेघा सूर्यवंशी, भूमिका वर्मा, शिल्पा सहानी आणि आयूष गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन सुरेखा चिखले यांनी केले तर चंद्रकांत मोहोड यांनी उपस्थितांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुष्पा बढिये, नरेंद्र बुटोलिया, प्रमोद इंगळे, निरज मिश्रा, गीता जालंदर आणि जिजा जैन यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिजामाता, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख जयंतीनिमित्त रॅली

**लोकनायक वृत्तसेवा –** भोकरदन येथील अलहुदा उर्दू प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, भोकरदन यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊ (जिजामाता), क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व शिक्षणक्रांतीच्या अग्रदूत फातिमा शेख यांच्या जयंतीनिमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले.या रॅलीत विद्यार्थ्यांनी ङ्कशिक्षण हाच विकासाचा पायाङ्क, ङ्कमहिला शिक्षण – समाज परिवर्तनङ्क, ङ्कसमता, स्वातंत्र्य व बंधुताङ्क अशा आशयाचे फलक व घोषणा देत जनजागृती केली. रॅली शाळेच्या परिसरातून निघून शहरातील





प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत पुन्हा शाळेत येऊन समाप्त झाली.कार्यक्रमाच्या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी जिजामाता यांचे संस्कारमूल्य, सावित्रीबाई फुले व फातिमा शेख यांनी स्त्री शिक्षणासाठी दिलेले योगदान आणि त्यांचा समाजावर झालेला प्रभाव याबाबत मार्गदर्शन केले.या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक जाणीव व शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेच्या सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.यावेळी उपस्थित संस्थेचे अध्यक्ष शब्बीर कुरेशी साहेब, नगराध्यक्षा समरीन नाज, शमीम मिर्झा, नारायण जीवरक, हर्षकुमार जाधव, शफिक शेठ,

# जामखेडमध्ये आशा द व्हेज ट्रीट हॉटेलचे संचालक प्रफुल सोळंकी यांच्यावतीने पत्रकार दिनानिमित्त पत्रकारांचा सन्मान

जामखेड तालुका प्रतिनिधी अजय अवसरे जामखेड परिसरातील खवय्यांसाठी केकेज व आशा भेळनंतर ङ्कआशा द व्हेज ट्रीटङ्क या शुद्ध शाकाहारी हॉटेलच्या रूपाने आणखी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. आसपासच्या तालुक्यात कुठेही नाही असे सुसज्ज, निसर्गरम्य असे ङ्कआशा द व्हेज ट्रीटङ्क नगर रोड, जामखेड येथे प्रफुल्ल सोळंकी, किरण रेडे, राजू भोगील व केदार रसाळ यांनी हे प्रशस्त हॉटेल सुरू केले आहे.पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रा. मधुकर राळेभात, उद्योगपती दिलीप





गुगळे,पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी,ॲड.प्रविण सानप, पवन राळेभात आदी उपस्थित होते.यावेळी बोलताना दिलीप गुगळे म्हणाले की, ङ्कआशा द व्हेज ट्रीटमुळे जामखेडच्या वैभवात भर पडणार आहे.ङ्क तर पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांनी पत्रकारांचे समाजातील योगदान महत्त्वाचे असून त्यांचा सन्मान व्हावा, असे मत व्यक्त केले. प्रा. मधुकर राळेभात यांनी पत्रकारितेला समाजाचा आरसा संबोधत पत्रकारांसाठी शासनाने पेन्शन योजना सुरू करावी, अशी मागणी केली आहे.यावेळी जामखेड पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नासिर भाई पठाण, अशोक निमोणकर, सुदाम वराट सर, ओंकार दळवी, वसंत सानप, समीर शेख, यासीन भाई शेख, डॉ.प्रकाश खंडागळे ,अविनाश बोधले ,पप्पू भाई सय्यद, अजय अवसरे ,किरण रेडे, फारुख शेख ,पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश जाधव, पोलीस कॉन्स्टेबल दत्तू बेलेकर, पोलीस हवालदार प्रवीण इंगळे, पोलीस मित्र आकाश पटेकर आधी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# शफिक पठाण गटनेते,व अब्दुल कदीर प्रतोद पदी निवड

**लोकनायक वृत्तसेवा –** भोकरदन येथील नगरपरिषद कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षाने आपली राजकीय ताकद ठळकपणे दाखवत नेतृत्वाची धुरा अनुभवी आणि विश्वासू हातात दिली आहे. पक्षाचे नवनिर्वाचित गटनेते म्हणून शफिक खा महेताब खा पठाण यांची तर अब्दुल कदिर अब्दुल शब्बीर यांची प्रतोदपदी निवड करण्यात आली.ही निवड माजी आमदार चंद्रकांत दानवे, युवा नेते सुधाकर दानवे, भोकरदन नगराध्यक्षा समरीन मिर्झा, नवनिर्वाचित नगरसेविका सौ. सुरेखा जाधव,सौ भारती,नवनिर्वाचित नगरसेवक



शमीम मिर्झा,चंद्रकांत पगारे, नसीम पठाण अझहर शहा,अमेर शफिक पठाण,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आली. या निवडीबद्दल नव्या पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.या प्रसंगी शहराध्यक्ष प्रा.नईम कादरी,लक्ष्मण ठोंबरे,प्रा.अंकुश जाधव, मुजिब कादरी, महेश औटी,योगेश शर्मा, फईम कादरी, मराठासेवक नारायण सोन्नी यांच्यासह अनेक राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छांचा वर्षाव केला. नव्या नेतृत्वामुळे नगरपरिषदेत रखडलेली विकासकामे मार्गी लागतील आणि शहराच्या विकासाला नवी गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.नवनिर्वाचित गटनेते व प्रतोद यांनीही जनतेच्या विश्वासाला पात्र ठरत भोकरदनच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

या निवडीमुळे नगरपरिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) अधिक आक्रमक भूमिकेत दिसून येणार असल्याचे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

लोकनायक


शनिवार दि.१० जानेवारी २०२६



# ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर. के. पब्लिक स्कूलचा द्वितीय क्रमांक

# सलग चार वर्षांपासून राज्यस्तरावर झेप; कोमल गाडेकर ची राज्यस्तरीय निवड

**लोकनायक वृत्तसेवा –** अंबाजोगाई येथे पार पडलेल्या ५३ व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात आर. के. पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेजने द्वितीय क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे या संस्थेचा विज्ञान प्रकल्प सलग चार वर्षांपासून प्रत्येक वर्षी राज्यस्तरासाठी निवडला जात असून, ही कामगिरी संस्थेच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाची व सातत्यपूर्ण गुणवत्तेची साक्ष देणारी आहे.या विज्ञान प्रदर्शनात इयत्ता नववीतील विद्यार्थिनी कोमल गाडेकर हिने इथेनॉल निर्मितीवर आधारित प्रयोग प्रभावीपणे सादर केला. या







## इथेनॉल : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे स्वप्न साकारण्याकडे एक पाऊल.

वेस्टपासून इथेनॉल निर्मितीवर आधारित आर. के. पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज गेवराई यांचा बायो–इथेनॉल प्रकल्प राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी निवडला गेला असून, हे प्रदर्शन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या नागपूर येथे होणार आहे. या विज्ञान प्रदर्शनाच्या वेळी उपस्थित सर्व विज्ञानप्रेमींनी हा प्रयोग नितीन गडकरी यांच्या स्वच्छ, स्वावलंबी व पर्यावरणपूरक ऊर्जेच्या स्वप्नाशी सुसंगत असल्याचे भावनिक शब्दांत अधोरेखित केले, आणि हा प्रकल्प निश्चितच ते स्वप्न साकार करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरेल, अशी भावना विज्ञान प्रेमी यांनी व्यक्त केली.

प्रयोगामध्ये घरगुती कचरा तसेच शेतकऱ्यांच्या पिकानंतर उरलेले जैविक अवशेष वापरून इथेनॉल कसे तयार करता येते, हे शास्त्रीय व सुबोध पद्धतीने मांडण्यात आले. सध्या जगभरात निर्माण होत असलेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर हा प्रयोग भविष्यासाठी अत्यंत दिशादर्शक ठरणारा आहे.या प्रकल्पाचे वैशिष्ट्य असे की, शेतकऱ्यांनी पीक काढणीनंतर उरलेले अवशेष केवळ कुजवून खत तयार करण्याऐवजी त्यापासून इथेनॉल निर्मिती केल्यास एकाच वेळी खत आणि इंधन दोन्ही मिळू शकते. यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न वाढण्यास मदत होणार असून पर्यावरण संरक्षणालाही चालना मिळणार आहे. तसेच तयार होणारा इथेनॉल औषधनिर्मिती क्षेत्रात वनस्पतींपासून औषधे तयार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात वापरता येऊ शकतो. आज रासायनिक औषधांपेक्षा नैसर्गिक व सेंद्रिय औषधांकडे जगाचा कल वाढत असून, अशा औषधनिर्मितीसाठी इथेनॉलचे साठे निर्माण करणे ही काळाची गरज ठरत आहे.आज वाहतुकीमधून होणारे प्रदूषण देशासमोर गंभीर समस्या बनले आहे. दिल्लीसारख्या शहरांमध्ये प्रदूषणामुळे शाळा बंद ठेवण्याची वेळ येणे, हे चिंताजनक वास्तव आहे. इथेनॉलचा वापर केल्यास वाहतुकीतून निर्माण होणाऱ्या घातक पान २ वर

## भविष्यासाठी बायो इथेनॉल

इंधन साठे झपाट्याने संपत आहेत.ह्व इथेनॉल स्वच्छ व पर्यावरणपूरक इंधन.ह्व घरगुती कचरा व शेतीतील अवशेषांचा उपयोग.ह्व शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्नाचा स्त्रोत.ह्व औषधनिर्मितीसाठी आवश्यक कच्चा माल.ह्व प्रदूषणमुक्त वाहतुकीकडे वाटचाल.

# अग्रशक्ती बहु मंडळाचा पदग्रहण सोहळा व २० वर्ष पूर्ती उत्साहात साजरी

**लोकनायक वृत्तसेवा –** येथील अग्रशक्ती बहु मंडळाच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा तसेच मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा उत्सव मंगळवार, दि. ७ जानेवारी रोजी शहरातील रुक्मिणी गार्डन येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास मंडळाच्या सदस्यांसह समाजातील मान्यवर महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.या सोहळ्यात अध्यक्षपदी सौ. नेहा शिरीष अग्रवाल, सचिवपदी सौ. रुची अर्पण गोयल, कोषाध्यक्षा म्हणून सौ. श्वेता सिद्धांत तवरावाला, उपाध्यक्षपदी सौ. नेहा विशाल गुप्ता, तसेच सहसचिवपदी सौ. पायल करण अग्रवाल यांनी पदभार स्वीकारला.तसेच मार्गदर्शक (अर्वींळीू) म्हणून सौ. सपना



प्रेमेंद्र अग्रवाल व सौ. स्मिता राजेशपित्ती यांची नियुक्ती करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात पदग्रहण समारंभाने झाली. नूतन कार्यकारिणी सदस्यांनी आपल्या पदाची शपथ घेतली. कार्यक्रमादरम्यान हळदी–कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महिलांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी केक कटिंग करून मंडळाच्या २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा आनंद साजरा करण्यात आला.२० माजी अध्यक्षांचा विशेष गौरवअग्रशक्ती बहु मंडळाच्या स्थापनेपासून आजपर्यंत अध्यक्षपद भूषविणाऱ्या २० माजी अध्यक्षा यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. त्यांच्या सामाजिक, पान २ वर

# सेवानिवृत्ती वेतन धारकाच्या अन्यायकारक अटी विरुध्द निवेदन

**लोकनायक वृत्तसेवा –** बीड जिल्हा प्रतिनिधी :– पेन्शनर असोसिएशन (छउउझअ)च्या वतीने दि.९.१.२०२६ रोजी देशभरात पुकारण्यात आलेल्या धरणे आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधून घेऊ इच्छितो यांना महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना बीडच्या वतीने राज्य अध्यक्ष शेख वजीर राज्याध्यक्ष व कार्याध्यक्ष रामहरी घुले आणि बीड जिल्हा अध्यक्ष हनीफ पठाण तसेच प्राचार्य कॉम्रेड डीजी तांदळे मार्गदर्शक सेवानिवृत्त कृतिशील अधिकारी कर्मचारी संघटना बीड आणि डॉक्टर संजय तांदळे विभागीय अध्यक्ष ईपीएस ९५ छत्रपती संभाजी नगर व राजकुमार कदम सरचिटणीस मराठवाडा शिक्षक संघ नितीन जायभाय अध्यक्ष बीड शहर बचाव मंच व माणिक




राघोपंत कुलकर्णी सदस्य अशोक चंद्रकांत कुलकर्णी उपसचिव बीड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटना बाजीराव ढाकणे बीड जिल्हा समन्वयक,मोहनराव निराळे,ईस्माईल पटेल,प्रविण बुंदेले,शेख जाफर,गिते आबा से.नि.स.ले.अ. ,प्रकाश कुलकर्णी,मनोहर पान २ वर

# दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांकडून केज येथील वृद्धश्रामात स्नेहभोजन

## वृद्धाश्रम चालक महादेव बापू कराड यांचा पत्रकारांकडून सत्कार

**केज, लोकनायक वृत्तसेवा** दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने स्वामी समर्थ वृद्धाश्रम येथे वृद्धाश्रमातील आजी–आजोबा यांच्या समवेत दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करून स्वामी समर्थ वृद्धाश्रमातील आजी–आजोबा आणि पत्रकार बांधवांना स्नेह भोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला क्रीडा विश्व समितीचे केज तालुका अध्यक्ष तथा पत्रकार अनिल बापू वैरागे तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार महादेव काळे, कला क्रीडा विश्व समितीचे उपाध्यक्ष मुनीर कुरेशी, पत्रकार बाळासाहेब जाधव, स्वामी समर्थ वृद्धाश्रमाचे



संस्थापक अध्यक्ष महादेव बापू कराड यांची प्रमुख उपस्थिती होती,सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या व पत्रकार बांधवांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप–दिपानी पूजन करून अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने स्वामी समर्थ वृद्धाश्रमातील आजी–आजोबा यांचे प्रतिनिधी म्हणून गोपीनाथ पंचाळ या आजोबांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. व उपस्थित मान्यवर आणि पत्रकार बांधवांचे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. स्वाभिमानी पत्रकार संघाच्या स्थापनेपासून दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त प्रत्येक वर्षी ६ जानेवारी रोजी रुग्णांना फळाचे वाटप व विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्य, पान २ वर

# गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करा – माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**लोकनायक वृत्तसेवा –** विद्यार्थ्यांनी भविष्यात स्पर्धेचा काळ ओळखून आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करत उज्वल भविष्य घडविण्याचे प्रयत्न करावेत असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

सौ.के.एस.के. अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते हर्षद क्षीरसागर, सहसचिव गोविंद साळूंके, कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, अन्नतंत्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.झेड.एच. सय्यद, प्रा.डॉ.एस.टी. शिंदे, प्रा. डॉ.



व्ही.बी. तागड, प्रा.पी.जी. पौळ, डॉ.जी.पी. राऊत, प्रा.के.डी. नागरगोजे, प्रा.डॉ.जी.एम.बोडखे, प्रा.डी.ए.मुटकुळे, प्रा.बी.आर. चादर, प्रा.एस.आर.मस्के, प्रा.ए.सी. गार्डी, एल.एम. बोंद्रे आदिंसह सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

हैद्राबाद येथील राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळिवलेल्या स्नेहा दुधाळ हिचा सन्मान करण्यात आला तर आंतरविद्यापीठ महोत्सवात यश प्राप्त केलेल्या वेदांत स्वामी आणि अमित दळवी तसेच अभिजीत निकम या विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला. या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची हैद्राबाद येथील राष्ट्रीय एकात्मता शिबीरासाठी निवड झाली. तसेच गिता परजने, वैष्णवी भोंडवे, श्रेया लांब, घोडके सुरेश, मळेकर



आशिष आदि विद्यार्थ्यांचाही माजी मंत्री क्षीरसागरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या वेळी बोलताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, अन्नतंत्र व कृषि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले ही अभिमानाची बाब आहे. आपल्या संस्थेचे नाव उज्वल करणा या विद्यार्थ्यांना आपण प्रोत्साहन देत असतो. याच विद्यार्थ्यांची पान २ वर

# मयत ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला आ. सोळंके यांची लाखाची मदत.

**वडवणी लोकनायक वृत्तसेवा:–** वडवणी तालुक्यातील सोन्ना खोटा ग्रामपंचायत अंतर्गत डोंगरेवाडी येथील ऊसतोड मजूर गणेश नामदेव डोंगरे यांचा साखर कारखान्यात अपघाती मृत्यू झाला होता. या दुःखद घटनेनंतर माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी बुधवार (दि. ७) रोजी डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी स्वतःहून एक लाख रुपयांची आर्थिक मदत कुटुंबीयांना दिली.सविस्तर वृत्त असे की, डोंगरेवाडी येथील गणेश डोंगरे हे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी पत्नीसमवेत धाराशिव जिल्ह्यातील लोहारा



तालुक्यातील बिराजदार साखर कारखान्यात ऊसतोडणीसाठी गेले होते. कामादरम्यान त्यांचा दुर्दैवी अपघात होऊन मृत्यू झाला. गणेश डोंगरे यांच्याकडे अवघी दीड एकर कोरडवाहू शेती असून, त्यातून केवळ बाजरीचे अल्प उत्पन्न मिळते. त्यांच्या पश्चात वयोवृद्ध आई–वडील, पत्नी व तीन अल्पवयीन मुली असा कुटुंबीयांचा परिवार आहे. घरातील कर्ता पुरुष गेल्याने हे कुटुंब अक्षरशः उघड्यावर पडले आहे.या परिस्थितीची गंभीर दखल घेत आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी कुटुंबीयांचे सांत्वन केले. तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तातडीने मदत मिळावी यासाठी तहसीलदारांना आवश्यक सूचना दिल्या. याशिवाय संबंधित साखर कारखान्याकडून मदत मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी त्यांच्या समवेत ज्येष्ठ नेते सर्जेराव काळे, सभापती कल्याणराव आबूज, तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, नगराध्यक्ष शेषराव बापू जगताप, युवा नेते बाबरी सेठ मुंडे, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष अ ॅड. माधव काका शेंडगे, शहराध्यक्ष गणेश म्हेत्रे, युवक कॉंग्रेस तालुकाध्यक्ष विकास मुंडे, माजी सरपंच लखन पान २ वर

**सुचना**

दैनिक बीडचा **लोकनायक** वृत्त पत्रातुन प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी यासंबधी व्यवहार करावा. जाहीरातीत आपल्या उत्पादन व सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात. त्यांची लोकनायक वृत्तपत्र समुह कोण–तीही हामी घेत नसुन केलेल्या दाव्याची पुर्तता. जाहिरातदाराकडुन न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दूल लोकनंायक वृत्तपत्र समुह जवाबदार राहणार नाही. याची कृपया सन्माननिय वाचकांनी नोंद घ्यावी.










This newspaper printed by owner printer publisher editor Bharat Devdas Gaikwad chief editors Abhijeet Gaikwad at indradhanush printers and publishers near post office paid bid Kharagpur Beed 431122 Maharashtra and published at the office of Dainik loknayak near Kharagpura beed 431122 Maharashtra

हे पत्रक मालक मुद्रक प्रकाशक संपादक भारत देविदास गायकवाड कार्यकारी संपादक अभिजीत गायकवाड यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स अँड पब्लिशर्स पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे छापून दैनिक बीडचा लोकनायक कार्यालय पोस्ट ऑफिस जवळ पेठ बीड खडकपुरा बीड जिल्हा बीड ४३ ११ २२ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले निवासी संपादिका नायरा राज मुळे पी आर बी कायद्यानुसार सर्व वादविवाद बीड न्याय कक्षेत मोबाईल नंबर ९८ ५० १६ ५० ८२ / ९४ २० ४०६०१९ email- dainikloknayak@gmail.com